**महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,**

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग,दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

कार्यालयाचा दुरध्वनी क्र.२६४७ ४४ ३५ website : www.msbve.gov.in Email : chairman-msbve@nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-१/ता.मा.(LOI)/ ९९२ /२०१५
दिनांक :- 18 MAY 2015

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी **तात्पुरती मान्यता (Letter Of Intent)** प्रदान करणे.

संदर्भ:- १) शिक्षण व सेवायोजन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक : इएक्सएम-७३८४/ ३५८७५१/(५३५)/तांशि-१(अ), दि.२३ जानेवारी १९८६.
२) मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-१/मान्यता/२०१५-१६/०७, दिनांक ०२/०१/२०१५
३) प्रादेशिक कार्यालयाचे पत्र क्र. क-२/प्रमा.अभ्या./मान्यता प्रस्ताव/२०१५/२०१८ दिनांक १९-०३-२०१५
४) मराव्यशिपमं/का-१/ता.मा.(LOI)/७४९/२०१५, दिनांक ०२/०५/२०१५

**कार्यालयीन आदेश :-**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये **अमरावती** जिल्हयांतील सोबत जोडलेल्या जिल्हा निहाय यादीतील (मंडळाचे अभ्यासक्रम नव्याने सुरु करणे, जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम, जुन्या संस्थेतील अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमात तुकडी वाढ करणे.) **प्रपत्र - अ** मध्ये दर्शविलेल्या संस्थांना अभ्यासक्रम चालविणेसाठी खालील अटींच्या अधीन राहून **तात्पुरती मान्यता (Letter Of Intent)** देण्यात येत आहे. ज्या संस्थांना तात्पुरती मान्यता (LOI) नाकारणेत आलेली आहे त्याचा तपशिल **प्रपत्र - ब** मध्ये दर्शविणेत येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१ अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना शासन, संचालनालय, मंडळ कार्यालय / संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबंधित कार्यालयांचे कडून वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

२ ज्या संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी तात्पुरती मान्यता (Letter Of Intent) देणेत आलेली आहे, अशा संस्थांनी अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधांची जसे हत्यारे, यंत्रसामुग्री, साधनसामुग्री आणि फर्निचर्स, विहित शैक्षणिक अर्हतेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणूक करणे, जागा इत्यादींची पुर्ण पुर्तता मान्यता कार्यक्रमानुसार विहित मुदतीत करणे आवश्यक आहे.

३ ज्या संस्था पायाभूत सुविधांची व इतर बाबींची पूर्ण पुर्तता करतील, अशा संस्थांनी विहित मुदतीत संबंधीत जिल्हयांचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हयांचेकडे कार्यालयीन आदेश निर्गमित झालेचे दिनांकापासून १ महिन्यांचे आंत दिलेल्या नमुन्यात अर्ज (नमुना माहितीपुस्तिकेत) सादर करावयाचा आहे.

४ सदरची तात्पुरती मान्यता (LOI) निर्गमीत केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून २ वर्षापर्यंत वैध (Valid) असून ज्या संस्था कार्यालयीन आदेश निर्गमित झालेचे दिनांकापासून १ महिन्यांचे आंत पायाभूत सुविधा पूर्तता झालेबाबतचे अर्ज संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हयांचेकडे सादर करतील त्या संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी सन २०१५-१६ सत्रासाठी मान्यता प्रदान करणेत येईल.

५ ज्या संस्था अ.क्र.४ मध्ये दिलेल्या मुदतीनंतर व दि.३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत पायाभूत सुविधा पुर्तता झालेबाबतचे अर्ज संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाकडे सादर करतील, त्या संस्थांना सन २०१६-१७ सत्रासाठी मान्यता प्रदान करणेबाबत विचार करण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी.

६ जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हयांचेकडे ज्या संस्थांचे पायाभूत सुविधा पुर्ण पुर्तता झालेबाबतचे अर्ज प्राप्त होतील अशा संस्थांचे जिल्हा स्तरावरील समितीमार्फत निरीक्षण / तपासणी करणेत येईल. यासाठी संबंधीत संस्थेने छाननी तक्त्यात दिलेप्रमाणे सर्व बाबींचा तपशिल समितीसमोर तपासणीसाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

७ मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी संस्थांना, ज्या जागेत तात्पुरती मान्यता (LOI) देणेत आलेली आहे. त्याच जागेसाठी विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता प्रदान करणेत येईल. जर जागा बदल आढळलेस संबंधीत संस्थेची मान्यता रद्द करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

८ संस्थांना अभ्यासक्रम चालविण्यासाठीची तात्पुरती मान्यता (LOI) ही संस्थेने जागेसंबंधी सादर केलेल्या दस्ताऐवजामधील एकूण क्षेत्रफळांचे आणि नकाशा मधील उपलब्ध जागेच्या आधारे देण्यात आलेली आहे. तथापि अभ्यासक्रमांसाठीचे पायाभूत सुविधांचे निरीक्षणा दरम्यान त्या अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असलेली जागा ही थेअरीसाठी --किमान २००चौ.फु.ची १ वर्ग खोली व प्रात्यक्षिकासाठी १ अथवा जास्तीतजास्त २ खोल्यांमध्ये असणे आवश्यक आहे. अन्यथा अशा संस्थेतील अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेश करण्याची मान्यता देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

९ विहित आवश्यक असलेल्या पायाभुत सुविधांची तसेच इतर बाबींची पूर्ण पुर्तता करीत असलेल्या संस्थांनाच मंडळामार्फत विद्यार्थी प्रवेश करणेसाठीची मान्यता प्रदान करणेत येईल.

१० ज्या संस्थांना अभ्यासक्रम चालविण्यासाठी तात्पुरती मान्यता (LOI) मंडळामार्फत प्रदान करण्यात आलेली आहे , त्या संस्थांना मंडळाकडून विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता मिळालेशिवाय संबंधीत संस्थांना अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी प्रवेश करता येणार नाही. जर संस्थेने विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता मिळालेशिवाय विद्यार्थी प्रवेश केलेस, असे प्रवेश ग्राहय धरणेत येणार नाही. व ते अनधिकृत होतील आणि अशा संस्थावर **सन २०१३चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२०दिनांक २१/०८/२०१३रोजी प्रसिध्द केलेले अधिनियम अन्वये** दंडात्मक रक्कम व शिक्षेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची सर्व संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी .

११ प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा / वेतन व तद्अनुषंगीक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील. याबाबत शासन व शासन अधिपत्या खालील कोणत्याही कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१२. संबंधित अर्ज केलेल्या संस्थांचे प्राप्त नस्तीमधील/ प्रस्तावामध्ये अभिलेख्यानुसांर तात्पुरती मान्यता (LO I) प्रदान करण्यांत आलेली आहे. त्यामध्ये भविष्यात कांही विसंगती /बेकायदेशीरआढळल्यास संबधित संस्थेतेतील **अभ्यासक्रमाची मान्यता तात्काळ रद्द करण्यांत येईल** आणि **अशा दोषी संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.**यांची नोद घ्यावी.

१३ मंडळाचे अभ्यासक्रमासाठी प्रथमच नव्याने अभ्यासक्रम चालविणेसाठी संस्थेचे नाव मेडीकल/ इंजीनिअरींग/ पॉलीटेक्नीक / आय.टी.आय अथवा तत्सम देण्यात येउ नये आणि त्याऐवजी -------------- **व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर असे देणेबाबत** अशा सुचना निर्गमीत करण्यात आल्या होत्या. याप्रकरणी सोबतच्या यादीतील तात्पुरती मान्यता (LOI) देण्यात आलेल्या संस्थांनी अशा प्रकारे नावात बदल करून सादर न केल्यास अशा संस्थांचा मान्येसाठी विचार करण्यात येणार नाही,याची नोंद घ्यावी.
यासाठी संबंधीत संस्थेने पायाभूत सुविधा व इतर बाबींच्या पूर्तता प्रस्ताव / अर्ज सादर करतेवेळी त्यामध्ये संस्थेचे जुने नाव व सुधारीत नाव असे दोन्ही नावे नमूद करावयाची आहे.

१४. शासन शुध्दीपत्रक क्रमांक : व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५(क)/व्यशि-४, दि.१६ जानेवारी, २०१३ अन्वये आवश्यक ती अनामत रक्कम रोखीने चलनाव्दारे अथवा बँक गॅरन्टी च्या स्वरुपात संबंधीत संस्थेने भरणे आवश्यक आहे.

१५. ज्या संस्थांना मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी मान्यता देणेत येईल त्याचा तपशिल मंडळाची वेबसाईट www.msbve.gov.in वर टाकणेत येईल. याप्रकरणी कोणताही पत्रव्यवहार करण्यांत येणार नाही, नोंद घ्यावी.

सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

१) मा.संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,**अमरावती** यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,**अमरावती** हयांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संबंधीत संस्थेस तात्काळ कळवून याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
संगणक विभाग - केवळ मंडळाचे वेब साईटवर टाकणेसाठी. ५. संबंधीत संस्था

D:/Valvi/ Manyata Kar Addesh letter/SDM

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

संदर्भ :- १) मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-१/मान्यता/२०१५-१६/०७, दिनांक ०२/०१/२०१५

२)प्रादेशिक कार्यालयाचे पत्र क्र. क-२/प्रमा.अभ्या./मान्यता प्रस्ताव/२०१५/२०१८, दिनांक १९-०३-२०१५

३) मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-१/ता.मा.(LOI)/७४९/२०१५ दिनांक ०२/०५/२०१५

**प्रादेशिक कार्यालय :- अमरावती**

**जिल्याचे नाव :-अमरावती**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता तात्पूरती मान्यता( Letter of Indent) देण्यात आलेल्या/नाकारण्यात आलेल्या संस्थांची नावे / अभ्यासक्रम तुकडी खालील प्रमाणे

**जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरू करणे**

| अ. क्र. | संस्था कोड क्र. | संस्थेचे नाव | शैक्षणिक वर्ष २०१५-१६करिता तात्पुरती मान्यता ( Letter of Indent) देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचे नाव व तुकडयांची संख्या (प्रपत्र-अ) | | | | | शैक्षणिक वर्ष २०१५-१६करिता तात्पुरती मान्यता ( Letter of Indent) नाकारण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचे नाव व तुकडयांची संख्या (प्रपत्र-ब) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अभ्यासक्रम कोड क्रमांक | अभ्यासक्रमाचे नाव | तुकडी संख्या | माध्यम | ज्या नावाने आणि ज्या जागेत संस्था सुरू करावयाची त्याचा पूर्ण पत्ता | अभ्यासक्रम कोड क्रमांक | अभ्यासक्रमाचे नांव | तुकडी संख्या | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | २८०६६४ | महाराष्ट्र व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, भांबोरा पो. कवठाळ, ता. मोर्शी जि. अमरावती | ३०४२०२ | सी.सी.इन बांधकाम पर्यवेक्षक | १ | म/इं. | महाराष्ट्र व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, भांबोरा पो. कवठाळ, ता. मोर्शी जि. अमरावती | --- | --- | --- | --- |
| | | | ४११११११ | सी.सी. इन सुरक्षा रक्षक प्रशिक्षण | १ | म/इं. | | --- | --- | --- | --- |

सचिव

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण

परीक्षा मंडळ, मुंबई ४०० ०५१